राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मूलभूत / पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी अनुदान वितरित करण्यास मंजूरी देण्याबाबत - सन २०१९-२०

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : ग्राक्षेवि -२०१९/प्र.क्र.२१/का.९
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २४ जून, २०१९

वाचा -

1) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र: ग्राक्षेवि- २०१५/प्र.क्र.७७/ का.९, दि.२२ सप्टेंबर, २०१५.
2) शासन पूरकपत्रक,अल्पसंख्याक विकास विभाग, क्षेविका-२०१५/प्र.क्र.६/का.९, दि. ९ मार्च, २०१६.
3) शासन परिपत्रक , वित्त विभाग क्र. अर्थसं- २०१९/प्र.क्र. ४४/अर्थ-३, दि. ०१ एप्रिल, २०१९.

प्रस्तावना :-

राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मुलभूत/ पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देऊन ग्रामीण भागात वास्तव्यास असलेल्या अल्पसंख्याक लोकसमुहातील नागरिकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये ग्रामीण क्षेत्र विकास कार्यक्रम कार्यान्वित करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. तसेच संदर्भ क्र. २ येथील शासन पूरकपत्रान्वये, दि.२२ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयातील योजनेची कार्यपध्दती या शीर्षाखाली परिच्छेद (क) (iii) च्या पुढे परिच्छेद दाखल करण्याचा निर्णय शासन मान्यतेने घेतला आहे. त्यानुसार मा. खासदार व आमदार तसेच जिल्हाधिकारी यांच्याकडून शासन मान्यतेसाठी प्राप्त ग्रामपंचायत प्रस्तावांना मंजूरी देऊन सन २०१९-२० या आर्थिक वर्षात उपलब्ध तरतूदीपैकी निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्यातील ग्रामीण क्षेत्र विकास योजनेकरीता सन २०१९-२० या आर्थिक वर्षात रु.५१,००,००,०००/- (अक्षरी रुपये एक्कावन्न कोटी फक्त) एवढा निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. संदर्भ क्र. ३ च्या शासन परिपत्रक, वित्त विभाग दि.०१/०४/२०१९ च्या मार्गदर्शक सूचनानुसार अर्थसंकल्पीत निधीपैकी माहे एप्रिल, २०१९ ते जुलै, २०१९ पर्यंत या योजनेकरिता एकूण रु.१७,००,००,०००/-(अक्षरी रुपये सतरा कोटी फक्त) इतका निधी वितरणास मान्यता प्राप्त झाली आहे. मा.मंत्री/ राज्यमंत्री/ खासदार/ आमदार तसेच जिल्हाधिकारी यांच्याकडून शासनास प्राप्त झालेल्या ग्रामपंचायतींचे प्रस्तावांना सन २०१९-२०च्या अर्थसंकल्पीत उपलब्ध तरतूदीपैकी अनुदान वितरीत करण्यास शासनाची मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुसार या शासन निर्णयासोबतच्या **परिशिष्ट -"अ"** मध्ये दर्शविल्याप्रमाणे **रु. ६,८४,००,०००/-(अक्षरी एकूण रुपये सहा कोटी चौऱ्याऐंशी लक्ष फक्त)** ग्रामीण क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत अनुदान मंजूर करण्यात येत असून हे अनुदान संबंधित जिल्ह्याचे

जिल्हाधिकारी यांचेमार्फत संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या स्वाधीन करण्यात येत आहे.

२. संबंधित अल्पसंख्याक बहुल ग्रामपंचायतींना मंजूर करण्यात आलेले अनुदान वितरित करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी, नियंत्रक अधिकारी आणि आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाहतील. **परिशिष्ट -"अ"** मध्ये दर्शविलेली कामे इतर योजनेतून करण्यात आलेली नाहीत, याची शहानिशा व खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी व जर सदर काम इतर योजनेतून मंजूर केले असल्यास त्या बदल्यात इतर काम मंजूर निधीच्या मर्यादेत राहून बदल करण्याचे अधिकार संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना राहतील. उपरोक्त कामाच्या बदल्यात इतर काम करणे शक्य नसल्यास त्यासाठी वितरीत केलेला निधी शासन जमा करण्यात यावा. तसेच संबंधित जिल्हाधिकारी यांनी उपरोक्त कामांचे अंदाजपत्रक बांधकाम विभागाकडून प्राप्त करून घ्यावे. याबाबतची सर्व कागदपत्रे शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार प्राप्त करून घेण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी करावी. त्यानंतर त्यांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात यावी व निधी संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना सुपूर्द करण्यात यावा.

३. ज्या विवक्षीत प्रयोजनासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे, केवळ त्याच प्रयोजनासाठी संबंधित ग्रामपंचायतींनी निधी खर्ची टाकणे अनिवार्य आहे. संबंधित जिल्हाधिकारी /मुख्य कार्यकारी अधिकारी, संबंधित जिल्हा परिषद यांच्याकडून अनुदान वितरित करण्यात आल्यानंतर ग्रामपंचायतींनी प्रस्तावात नमूद केलेली कामे पूर्ण करणे आवश्यक आहे व याबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे या शासन निर्णयाच्या **परिशिष्ट -"ब"** मध्ये विहित केलेल्या नमुन्यात अल्पसंख्याक विकास विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे. ग्रामीण क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत राज्यातील संबंधित अल्पसंख्याक बहुल ग्रामपंचायतींनी हाती घेतलेल्या विकासकामांच्या प्रगतीबाबत संनियंत्रण करुन त्याबाबतचा अहवाल संबंधित जिल्हाधिकारी यांनी शासनास सादर करावा.

४. या योजनेंतर्गत होणारा खर्च “मागणी क्र. झेड ई-१,२२३५ -सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२-समाजकल्याण,१९८-ग्रामपंचायतींना सहाय्य अनुदान, राज्य योजनांतर्गत योजना, ०१ अल्पसंख्याकांना सहाय्य, (०१) (०१)अल्पसंख्याक बहुल ग्रामपंचायतींना सहायक अनुदान (कार्यक्रम), (२२३५ बी ०८५) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)” या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० या वर्षाकरीता मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात येईल.

५. “सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ भाग पहिला, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि.१७ एप्रिल, २०१५ अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त झालेल्या अधिकारांतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार तसेच उपरोक्त संदर्भ क्र. ३ येथील वित्त विभागाच्या दि.१ एप्रिल, २०१९ रोजीच्या परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनांस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.”

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६२४१७०३०९६११४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dinesh M. Sonavane

Digitally signed by Dinesh M. Sonavane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9cabb099fd0576208f4caa310d2e7860201ab5363a2133e0927ff26c0f016fdf, 2.5.4.45=032100CD9D66225CED8BAE27E0E1249D39EC14A54419D0A13504B49333B23F92B58199, cn=Dinesh M. Sonavane
Date: 2019.06.24 17:10:55 +05'30'

(दि. मा. सोनवणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

1) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई,
2) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मंबई,
3) मा.मंत्री / मा.राज्यमंत्री (अवि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
4) मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव, महाराष्ट्र शासन,
5) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
6) महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता)महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर,
7) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
8) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
9) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
10) सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई,
11) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
12) अर्थसंकल्प शाखा (का.७), अविवि, मंत्रालय, मुंबई,
13) निवडनस्ती (कार्यासन-९).

शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग क्र. ग्राक्षेवि - २०१९/प्र.क्र. २१/का.९, दि. २४ जून, २०१९

परिशिष्ट "अ"

अ. क्र.	जिल्हा	तालुका	ग्रामपंचायतीचे नांव	विकास कामाचे नाव	मंजूर निधी (रुपये)
१	**पुणे**	आंबेगाव	निरगुडसर	अल्पसंख्याक कब्रस्तानला संरक्षक भिंत बांधणे	१० लक्ष
				जिल्हा -पुणे	**१०लक्ष**
२	**बीड**	धारुर	मौजे गावंदरा	१)अल्पसंख्याक बौध्द समाजासाठी स्मशानभूमी बांधकाम करणे	१० लक्ष
				२)अल्पसंख्याक बौध्द समाजासाठी विद्युतीकरण (हायमास्ट दिवे) बसविणे	१० लक्ष
				३)मातंग वस्तीत सिमेंट रस्ता करणे	१० लक्ष
		बीड	पाली	अल्पसंख्याक वस्तीमध्ये सिमेंट रस्ते तयार करणे	१२ लक्ष
		शिरुर	तागडगाव	मुस्लीम कब्रस्तान संरक्षण भिंत बांधकाम करणे.	५ लक्ष
			खोकरमोहा	मुस्लीम वस्तीत सिमेंट काँक्रीट रस्ता व नाली बांधकाम करणे	३ लक्ष
			येवलवाडी	मुस्लीम वस्तीत सिमेंट काँक्रीट रस्ता व नाली बांधकाम करणे	३ लक्ष
			खालापुरी	मुस्लीम वस्तीत सिमेंट काँक्रीट रस्ता व नाली बांधकाम करणे	३ लक्ष
			आर्वी	मुस्लीम वस्तीत सिमेंट काँक्रीट रस्ता व नाली बांधकाम करणे	३ लक्ष
			हिवरसिंगा	मुस्लीम वस्तीत सिमेंट काँक्रीट रस्ता व नाली बांधकाम करणे	३ लक्ष
			फुलसांगवी	मुस्लीम वस्तीत सिमेंट काँक्रीट रस्ता व नाली बांधकाम करणे	२ लक्ष
				जिल्हा -बीड	**६४ लक्ष**
३	**कोल्हापूर**	हातकणंगले	रेंदाळ	अल्पसंख्याक दफनभूमीमध्ये दगडी कंपाऊंड व आर.सी.सी. गटार बांधणे.	१० लक्ष
				जिल्हा -कोल्हापूर	**१० लक्ष**
४	**वाशिम**	मंगरुळपीर	शेलुबाजार	मुस्लीम समाजासाठी शादीखाना बांधणे	२० लक्ष
				जिल्हा -वाशिम	**२० लक्ष**
५	**रत्नागिरी**	राजापूर	मौजे सौंदळ	मुख्य रस्ता ते मुस्लीमवाडीकडे जाणारा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.	५ लक्ष

		रत्नागिरी	राई	१)जाकादेवी खालगाव बंदर रोड ते बौध्दवाडी रोड डांबरीकरण करणे	१० लक्ष
				२)भू बेकरी ते बौध्दवाडी रोड डांबरीकरण करणे	१० लक्ष
		खेड	मौजे भोस्ते	अल्पसंख्याक वस्तीत सिंमेट रस्ता करणे	१० लक्ष
			मौजे म्हाप्रळ	अल्पसंख्याक वस्तीत सिमेंट रस्ता व हायमास्ट दिवे बसविणे	२५ लक्ष
				जिल्हा -रत्नागिरी	**६० लक्ष**
६	**अकोला**	अकोला	मौजे अन्वी	इरफान पठाण ते खुजउद्दीन देशमुख, लालशहा ते रहिम पटेल ते जमिल पटेल यांच्या घरापर्यंत रस्ता सिमेट कॉंक्रीट करणे	१० लक्ष
		अकोला	मौजे बोरगाव मंजू	अब्दुल बाजीद दुकान ते गफ्फुरभाई यांच्या घरापर्यत रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे	१५ लक्ष
				जिल्हा – अकोला	**२५ लक्ष**
७	**सातारा**	पाटण	मौजे जानूगडे वाडी	मुस्लीम वस्ती अंतर्गत रस्ता सुधारणा	१० लक्ष
			मौजे ढेबेवाडी	मुस्लीम वस्ती अंतर्गत रस्ता सुधारणा	१० लक्ष
		कराड	मौजे कारवे	अल्पसंख्याक वस्तीमध्ये रस्ता कॉंक्रीटीकरण करणे	२०लक्ष
				जिल्हा – सातारा	**४० लक्ष**
८	**नांदेड**	नांदेड	टेंभूर्णी	मस्जिद दुरुस्ती करणे	५ लक्ष
		बिलोली	किनाळा	इदगाह मैदान व स्मशानभूमी संरक्षण भिंत बांधणे	१० लक्ष
		देगलूर	मानूर	सी.सी.रस्ता व नाली बांधकाम करणे	१० लक्ष
		नांदेड	पासदगाव	अल्पसंख्याक वस्तीत सिमेंट रस्ता / नाली बांधकाम करणे	१० लक्ष
			पुणेगाव	अल्पसंख्याक वस्तीत सिमेंट रस्ता / नाली बांधकाम करणे	१० लक्ष
				जिल्हा – नांदेड	**४५ लक्ष**
९	**औरंगाबाद**	सोयगाव	निंबायती	सिमेंट रस्त्याचे बांधकाम करणे	३ लक्ष
			देव्हारी	कब्रस्तान संरक्षण भिंत व रस्त्याचे बांधकाम करणे	३ लक्ष
			सावळदबारा	कब्रस्तान संरक्षण भिंत व रस्त्याचे बांधकाम करणे	३ लक्ष
		सिल्लोड	चारनेर	कब्रस्तान संरक्षण भिंत व रस्त्याचे बांधकाम करणे	३ लक्ष

			पिंपळदरी	कब्रस्तान संरक्षण भिंत व रस्त्याचे बांधकाम करणे	३ लक्ष
			पालोद	कब्रस्तान संरक्षण भिंत व रस्त्याचे बांधकाम करणे	३ लक्ष
			टाकळी खु.	कब्रस्तान संरक्षण भिंत व रस्त्याचे बांधकाम करणे	३ लक्ष
			उंडणगाव	शादीखाना बांधकाम करणे	७ लक्ष
			जळकी बाजार	शादीखाना बांधकाम करणे	५ लक्ष
			पळशी	शादीखाना बांधकाम करणे	५ लक्ष
			केऱ्हाळा	शादीखाना बांधकाम करणे	५ लक्ष
			मंगरुळ	शादीखाना बांधकाम करणे	५ लक्ष
			अंधारी	शादीखाना बांधकाम करणे	७ लक्ष
			मौजे अंजनडोह	स्मशानभूमीला संरक्षक भिंत बांधणे.	१० लक्ष
		वैजापूर	वाकला	कब्रस्तान संरक्षण भिंत बांधणे	१० लक्ष
		कन्नड	पिशोर	१)कब्रस्तान संरक्षण भिंत दुरुस्ती व सुशोभिकरण करणे	७ लक्ष
				२)इदगाह या ठिकाणी कोटा फरशी बसविणे	६ लक्ष
		सोयगाव	निंभोरा	कब्रस्तानला जोडणारा सिमेंट कॉंक्रीट रस्ता करणे	७ लक्ष
		औरंगाबाद	आगरकानडगाव	कब्रस्तान सरंक्षण भिंत बांधणे व सुशोभिकरण करणे	१० लक्ष
				जिल्हा - औरंगाबाद	**१०५ लक्ष**
१०	**सांगली**	खानापूर (विटा)	मौजे भेडावडे	१) अल्पसंख्याक वस्तीमधील फरिद बाबा येथील पेव्हींग ब्लॉक बसविणे.	२ लक्ष
				२) अल्पसंख्याक वस्तीत पथदिवे बसविणे	३ लक्ष
		खानापूर	लेंगरे	शादीखाना बांधणे	१० लक्ष
			भाळवणी	मुस्लीम दफनभूमीस संरक्षक भिंत बांधणे	१० लक्ष
				जिल्हा -सांगली	**२५ लक्ष**
११	**नंदुरबार**	तळोदा	मौजे सिलिंगपुर (नवे)	ख्रिश्चन वस्तीत पेव्हर ब्लॉक बसविणे.	१० लक्ष
				जिल्हा -नंदुरबार	**१० लक्ष**
१२	**बुलडाणा**	बुलडाणा	मौजे चांडोल	१)शेख अतिकभाई ते शेख इशाक शेठ यांच्या घरापर्यंत रस्त्यांचे बांधकाम करणे	२.५० लक्ष
				२)शेख अताउल्ला ते बुढाणभाई रिजवाणे मस्जिद पर्यंत रस्त्यांचे बांधकाम करणे	२.५० लक्ष

				३)शेख जफर शेख बिस्मील्ला ते शखे सलीम यांच्या घरापर्यंत रस्त्यांचे बांधकाम करणे	२.५० लक्ष
				४)शेख अतीक यांच्या घरापासून ते शेख जावेद यांच्या घरापर्यंत रस्त्यांचे बांधकाम करणे	२.५० लक्ष
		चिखली	मौजे अमडापूर	१)माणिक चौक ते बबुभाई यांच्या घरापर्यंत रस्त्यांचे बांधकाम करणे	२.५० लक्ष
				२) शेख मस्तान यांच्या घरापासून ते मंजूर मिश्री यांच्या घरापर्यंत रस्त्यांचे बांधकाम करणे.	२.५० लक्ष
				३) चिखली रोड ते फारुख ठेकेदार यांच्या घरापर्यंत रस्त्यांचे बांधकाम करणे.	२.५० लक्ष
				४) हाफिज भाई मिरचीवाले यांच्या घरापासून ते शेख कुरेशी यांच्या घरापर्यंत रस्त्यांचे बांधकाम करणे.	२.५० लक्ष
		खामगाव	कंझारा	१) करामत ते बुढनभाई यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे.	५ लक्ष
				२)दिलशाह दुकान ते मुस्ताक भाई यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे	५ लक्ष
				३)हसनशहा ते सत्तारभाई यांचे घरा पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे	५ लक्ष
			झोडगा	शादीखाना बांधकाम करणे	१० लक्ष
				जिल्हा -बुलडाणा	**४५ लक्ष**
१३	**जालना**	जालना	सेवली	शादीखाना बांधकाम करणे	२५ लक्ष
		घनसावंगी	पारडगाव	शादीखाना बांधकाम करणे	१० लक्ष
		बदनापूर	वाहेगाव	बाजार वाहेगाव येथे सिमेंट रस्ता व सिमेंट नाली बांधणे	१० लक्ष

			गोहेगाव	सिमेंट रस्ता करणे	५ लक्ष
				जिल्हा -जालना	**५० लक्ष**
१४	**धुळे**	धुळे	देऊर	मुस्लीम अल्पसंख्याक वस्तीत रस्ता कॉंक्रीटकरण करणे.	१० लक्ष
			कापडणे	जैन अल्पसंख्याक समाजासाठी सामाजिक सभागृह बांधणे	१० लक्ष
			विंचूर	कब्रस्तानकडे जाणारा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे	१० लक्ष
			रतनपूरा	कब्रस्तानकडे जाणारा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे	१० लक्ष
			मोजे सायने	कब्रस्तान संरक्षण भिंत बांधकाम करणे	१० लक्ष
			बोरकुंड	अल्पसंख्याक वस्तीत सिमेंट रस्ता करणे	१० लक्ष
				जिल्हा -धुळे	**६० लक्ष**
१५	**गोंदिया**	सडक अर्जुनी	कोदामेढी	कब्रस्तान अंतर्गत सोयी सुविधा निर्माण करणे	१० लक्ष
		अर्जुनीमोर	महागाव	कब्रस्तान संरक्षण भिंत बांधणे	१० लक्ष
		गोंदिया	काटी	मुस्लीम कब्रस्तान आवार भिंत	१० लक्ष
				जिल्हा -गोंदिया	**३० लक्ष**
१६	**वर्धा**	आर्वी	मासोद	कब्रस्तान संरक्षण भिंत बांधकाम करणे.	१० लक्ष
				जिल्हा -वर्धा	**१० लक्ष**
१७	**जळगाव**	पाचोरा	मौजे भोकरी	अल्पसंख्याक वस्तीमध्ये रस्ता कॉंक्रीटीकरण करणे	१० लक्ष
		भडगाव	मौजे कजगांव	अल्पसंख्याक वस्तीमध्ये रस्ता कॉंक्रीटीकरण करणे	१० लक्ष
				जिल्हा -जळगाव	**२० लक्ष**
१८	**सोलापूर**	करमाळा	मोजे कंदर	मुस्लीम वस्तीमध्ये सिमेंट (कॉंक्रीट) रस्ता करणे	१० लक्ष
				जिल्हा -सोलापूर	**१० लक्ष**
१९	**रायगड**	महाड	कुंबळे मोहल्ला	कब्रस्तानला संरक्षक भिंत बांधणे	१० लक्ष
				जिल्हा -रायगड	**१० लक्ष**

२०	**यवतमाळ**	महागांव	मौजा काळी (दौ)	शेख इसाक पहेलवान यांच्या घरापासून ते शेख शफी शेख गुलाब यांच्या घरापर्यंत सिमेंट नाली करणे.	१० लक्ष
				जिल्हा -यवतमाळ	**१० लक्ष**
२१	**लातूर**	औसा	मौजे होळी	शहाबुद्दीन शेख यांचे घर ते मस्जिदपर्यंत सिमेंट रस्ता बांधणे.	२५ लक्ष
				जिल्हा -लातूर	**२५ लक्ष**
				एकूण	६,८४,००,०००/-
(अक्षरी एकूण रुपये सहा कोटी चौऱ्याऐंशी लक्ष फक्त)					

Dinesh M. Sonavane

Digitally signed by Dinesh M. Sonavane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9cabb099fd0576208f4caa310d2e7860201ab5363a2133e0927ff26c0f016fdf, 2.5.4.45=032100CD9D66225CED8BAE27E0E1249D39EC14A54419D0A13504B49333B23F92B58199, cn=Dinesh M. Sonavane
Date: 2019.06.24 17:12:27 +05'30'

(दि. मा. सोनवणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग क्र. ग्राक्षेवि - २०१९/प्र.क्र.२१/का.९, दि. २४ जून, २०१९

परिशिष्ट - "ब"

उपयोगिता प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, अल्पसंख्याक विकास विभागाने राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मुलभूत / पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यान्वित केलेल्या क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. **ग्राक्षेवि २०१९/ प्र.क्र.२१/ का.९, दि. जून,२०१९** अन्वये वितरित केलेला रु. /- (अक्षरी रु.) एवढा निधी पुढील विकासकामांसाठी उपयोगात आणला आहे :-

विकासकाम/ विकासकामे	वापरलेली रक्कम
अ.	रु.
ब.	रु.
क.	रु.
ड.	रु.

असेही प्रमाणित करण्यात येते की, क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत ज्या निकष/ अटींनुसार शासनाने अनुदान मंजूर केले होते, त्या निकष/ अटींची यथायोग्यरित्या पुर्तता करण्यात आली आहे. तसेच ज्या प्रयोजनाकरिता निधी मंजूर करण्यात आला होता, त्याच प्रयोजनाकरिता निधिचा प्रत्यक्षात विनियोग झाला आहे, याची खातरजमा करण्याकरिता मी खालील दस्तऐवज/अभिलेखांची तपासणी केली आहे :-

तपासणी केलेल्या दस्तऐवज /अभिलेखांचे प्रकार :-

१. प्रमाणक आणि पुस्तक लेखा (Vouchers and Book of Accounts)
२. मोजणी पुस्तके (Measurement Books)
३. सहायक अनुदान / कर्ज नोंदवही (Grant-in-aid/ Loan Register)
४. खर्च नोंदवही (Expenditure Register)

ग्रामविकास अधिकारी / ग्रामसेवक, संबंधित ग्रामपंचायत यांची स्वाक्षरी	मुख्य कार्यकारी अधिकारी, संबंधित जिल्हा परिषद यांची प्रतिस्वाक्षरी
नाव तारीख स्थळ कार्यालय मुद्रा	नाव तारीख स्थळ कार्यालय मुद्रा

*****